लोकमत कोल्हापूर, रविवार, दि. २८ जून २०२६

शून्यातून आठशे कोटींचे साम्राज्य उभे करणारे 'शुगर किंग'

# राजकुमार देसाई

प्रोप्रायटर, डी स्वयम् शुगर हाऊस, कोल्हापूर



**कष्ट,** प्रामाणिकपणा व अचाट धाडसाच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात करता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोल्हापूरचे उद्योजक राजकुमार देसाई. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या राजकुमार यांनी व्यावसायिक पार्श्वभूमी नसताना, साखर व्यवसायात देशपातळीवर कार्यकर्तृत्वाची चमक दाखविली आहे. त्यांचा हा थक्क करणारा प्रवास नवउद्योजकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

### संघर्षातून शिक्षणाची जिद्द

रुकडी येथून माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी 'कमवा आणि शिका' तत्त्वावर काम करत स्वामी विवेकानंद महाविद्यालयातून बी.कॉम. आणि नंतर एम.कॉम. पूर्ण केले. त्यांनी 'जी.डी.सी.अँड ए.' पदवी घेऊन दोन वर्षे सहकारी संस्थांचे लेखापरीक्षक म्हणून काम केले. मात्र, तिथली कार्यपद्धती न पटल्याने त्यांनी इचलकरंजीतील कन्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी सुरू केली. परंतु, तिथल्या मानधनातील विषमता मनाला न पटल्याने त्यांनी ती नोकरीही सोडली.

त्यानंतर मित्राच्या सोबतीने 'देसाई-पाटील' फर्म सुरू करून गोवा पोर्टवरून कोळसा व कच्च्या साखरेची वाहतूक सुरू केली. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे वाहतूक व्यवसाय अडचणीत आल्यावर खचून न जाता २०१२ मध्ये साखरेचे 'ब्रोकर' म्हणून काम सुरू केले. लोकल मार्केट, रेल्वे रेक आणि निर्यात अशा सर्व पातळ्यांवर त्यांनी पकड मजबूत केली.

वार्षिक ८०० कोटी उलाढालीच्या या साम्राज्याचे प्रमुख असूनही देसाई यांचे पाय जमिनीवर आहेत. त्यांच्या कार्यालयात साखर कारखान्यांच्या संस्थापकांची तैलचित्रे आहेत, ज्यांना अभिवादन करूनच ते कामाची सुरुवात करतात.

लोकमत
कोल्हापूर, रविवार, दि. २८ जून २०२६

### ज्ञान, विज्ञान, सुसंस्कारांनी क्रांती घडवून आणणारा वारसदार

# प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कार्याध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



**'ज्ञान,** विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' हे ब्रिद घेऊन राज्याच्या कानाकोपऱ्यांत शिक्षणाची गंगा पोहोचविणाऱ्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी वडील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा वारसा समर्थपणे पुढे चालविला आहे. वंचित आणि महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य दिले.

**डॉ. बापूजी साळुंखे यांचा वारसा**

१७ जानेवारी १९४६ रोजी जन्मलेल्या अभयकुमार साळुंखे यांना डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्याकडून समाजसेवेचे बाळकडू मिळाले. बापूजींनी खडतर परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून पुढे स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. समाजसुधारणेसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून १९५४ मध्ये कराड येथे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. राज्यभर शाळा-महाविद्यालयांचे जाळे विणणाऱ्या बापूजींच्या कार्याचा विद्यापीठाने डी.लिट. देऊन गौरव केला होता.

प्राचार्य साळुंखे यांनी मराठीचे शिक्षक म्हणून कारकिर्द सुरू केली आणि पुढे संस्थेचे नेतृत्व स्वीकारले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था महाराष्ट्र व कर्नाटकच्या १३ जिल्ह्यांमध्ये ४१० हून अधिक संस्कारकेंद्रांसह विस्तारली आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच बीबीए, बीसीए, संगणक अभ्यासक्रम व व्यावसायिकसारखे रोजगारक्षम उपक्रम सुरू केले. मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा व वंचित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली.

त्यांना शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज उत्थान', 'आदर्श शिक्षक' आणि 'कोल्हापूर भूषण'सारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. हा वारसा नातू व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे पुढे नेत आहेत.